# खरी चढण आता सुरू झाली आहे!



ठाणे जिल्ह्यातील वाडा तालुक्यात 'क्वेस्ट' या संस्थेच्या माध्यमातून प्राथमिक व पूर्वप्राथमिक शिक्षणासाठी काम.
औपचारिक शिक्षणाचे काम मुख्यत: शाळेच्या वर्गात होत असते, हे लक्षात घेऊन वर्गांतर्गत प्रक्रियांचे सबलीकरण केले.
जिथे सरकारी शाळांतील शिक्षकांचे सहकार्य मिळेल त्या ठिकाणी त्यांच्यामार्फत व जिथे तशी अनुकूल परिस्थिती नाही तिथे, गावातील सुशिक्षित युवकांना खास प्रशिक्षण देऊन शाळेला पूरक म्हणून मुलांसोबत काम केले जाते.
प्राथमिक शिक्षणाच्या अनुषंगाने विविध विषयांसाठी विविध प्रकारची शैक्षणिक सामग्री तयार करणे,
पूरक साहित्य तयार करणे,
व्हीडिओ फिल्मस् तयार करणे,
विविध सर्वेक्षणे करणे,
लेखन-टिपणे तयार करणे,
पुस्तिका तयार करणे;
अशा पद्धतीची अनेक कामे/प्रकल्प निमकर यांनी पूर्ण केली आहेत.

या पुरस्काराच्या निमित्ताने शालेय शिक्षण आणि आदिवासी मुलांचे शिक्षण यांविषयी लिहिण्याची संधी मिळाली याचा मनापासून आनंद होत आहे. शिक्षणाच्या क्षेत्रात येण्याचा निर्णय मी ठरवून किंवा फार विचारपूर्वक घेतला असं नाही. अगदी योगायोगाने १९८५ साली अनुताई वाघ यांच्या 'ग्राममंगल' या संस्थेत जाण्याची संधी मला मिळाली. प्राध्यापक रमेश पानसे यांच्याशी संपर्क आला आणि त्यांनी प्रेरित केलं (किंवा खरं तर ढकललं) म्हणून मी आदिवासी मुलांच्या शिक्षणाचं काम करू लागलो. नंतर मात्र या कामामधलं आव्हान हेच या कामात टिकून राहण्याचं मुख्य कारण बनलं. शिवाय एकूणच ग्रामीण जीवनाची संथ गती माझ्या स्वभावाला मानवणारी आहे, हेही मान्य करायला हवं. १२ वर्षे ग्राममंगलमध्ये बालशिक्षण, प्राथमिक शिक्षण, शिक्षक प्रशिक्षण, शैक्षणिक तंत्रविज्ञान या क्षेत्रांतील कामांचा समृद्ध अनुभव घेतल्यानंतर २००७ साली श्री. अतुल कुलकर्णी यांच्या सोबत क्वालिटी एज्युकेशन सपोर्ट ट्रस्ट (क्वेस्ट) या संस्थेची स्थापना करण्याचा निर्णय आम्ही घेतला. 'स्वातंत्र्य आणि विवेक या मूल्यांप्रत जाण्यासाठी प्रत्येकाला गुणवत्तापूर्ण शिक्षण' असा काहीसा क्वेस्टच्या कामामागचा विचार आहे. समाजातील अनेक प्रश्नांचे मूळ व्यक्तिगत पातळीवरील विवेकाच्या अभावात आहे आणि शिक्षणाने विवेक रुजवता येतो असे गृहीतक या कामामागे आहे.

संसदेने नुकत्याच केलेल्या शिक्षण हक्क कायद्यानंतर आजवर शिक्षणाच्या प्रवाहाबाहेर असणारी अनेक मुले औपचारिक शालेय शिक्षणाच्या प्रवाहात येण्याला आता अधिक चालना मिळेल. याचा परिणाम म्हणून शिक्षण व्यवस्थेचा विस्तार येत्या काळात प्रचंड प्रमाणात वाढणार आहे. आता पुढचे आव्हान या प्रचंड विस्तारलेल्या शिक्षण व्यवस्थेतून मिळणारे शिक्षण गुणवत्तापूर्ण कसे होईल हे पाहण्याचे आहे. शिक्षणाची गुणवत्ता म्हणजे नेमके काय हे कागदावर मांडणे गुंतागुंतीचे असले किंवा गुणवत्तेची एकच एक व्याख्या करणे अवघड असले, तरी शालेय शिक्षणाच्या गुणवत्तेची स्थिती फारशी समाधानकारक नाही, असे मत मात्र शिक्षणतज्ज्ञांपासून सर्वसामान्य माणसांपर्यंत सर्वच जण व्यक्त करताना दिसतात. अर्थातच या मतांना व्यक्तिगत अनुभवांचा भक्कम आधार असतो. शिवाय, त्या त्या वर्गासाठी अभ्यासक्रमात अपेक्षित असणारी उद्दिष्टे, वर्गातील बऱ्याच मुलांना गाठता येत नाहीत, ही बाब अनेक सर्वेक्षणांतून वारंवार पुढे आली आहे. ही बाब शिक्षणाची गुणवत्ता फारशी बरी नाही हेच दाखवते. शिक्षणाच्या गुणवत्तेच्या प्रश्नाला अनेक पैलू आहेत. त्यांतील काही आर्थिक-सामाजिक आहेत तर काही वर्गान्तर्गत घडणाऱ्या शिक्षणाच्या प्रक्रियेशी निगडित आहेत. मुलांच्या संपादणुकीवर सामाजिक-आर्थिक घटकांचा परिणाम होत असला तरी वर्गान्तर्गत घडणारी प्रक्रिया बळकट करून मुलांची संपादणूक वाढवण्याचे प्रयत्न करणे ही दिशा शालेय शिक्षणात काम करणाऱ्यांना आता घ्यावी लागेल, असे मला वाटते.

आपल्याकडे शालेय शिक्षणाला (एलिमेंटरी एज्युकेशन) स्वतंत्र ज्ञानशाखा म्हणून फारशी मान्यता नाही. विद्यापीठात पदवी वा पदव्युत्तर पातळीवर या विषयाचा अभ्यास करण्याची सोय अगदी मोजक्याच ठिकाणी उपलब्ध आहे. या विषयातील अर्थपूर्ण संशोधनाच्या कामाचे प्रमाण तर अगदी नगण्य आहे. खरे तर लहान मुलांना शिकवणे हे एक शास्त्र आहे असे अनेकदा मानण्यातही येत नाही. शिक्षणशास्त्रामध्ये गेल्या काही दशकांत मोठ्या प्रमाणावर बदल झाले आहेत. मुलाला कोरी पाटी किंवा मातीचा गोळा असे न मानता शिकण्याच्या प्रक्रियेतील एक क्रियाशील घटक मानले पाहिजे असे आता मान्य झाले आहे. 'मुले शिक्षकांनी दिलेले ज्ञान साठवून ठेवून त्याचा वापर करतात', असे मानण्याऐवजी मुले आपल्या ज्ञानाची स्वत: रचना करतात असा दृष्टिकोन पुढे आला आहे. जग समजून घेण्याच्या मुलाच्या प्रयत्नामधून त्याच्या ज्ञानाची रचना आकाराला येत असते असे या दृष्टिकोनात मानले जाते. मुलाने स्वत: अनुभव घेणे, विचार करणे, प्रश्न सोडवणे, प्रश्नाच्या उत्तरापर्यंत पोहोचायचे वेगवेगळे मार्ग तपासणे या बाबींना आता शिक्षणाच्या प्रक्रियेत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. या बाबींना उत्तेजन देणारी, पूरक ठरणारी शिक्षणपद्धती वर्गात असणे आता योग्य मानले जाते. अर्थात, याचा अर्थ असा अजिबात नाही की शिक्षकांचे शिक्षणप्रक्रियेतील स्थान गौण बनले आहे. उलट मुलांच्या ज्ञानरचनेला पोषक असे अनुभव आयोजित करणे, मुलांना गरज असेल तेथे मदत करणे, त्यांचे ज्ञानरचनेचे प्रयत्न समजून घेऊन त्यातील तर्कविसंगत बाबी मुलांच्या लक्षात आणून देणे अशी अगदी महत्त्वाची आणि गुंतागुंतीची भूमिका आता शिक्षकांनी करावी अशी अपेक्षा आहे. ही अपेक्षा पूर्ण करण्यासाठी प्रशिक्षित व्यावसायिक शिक्षकांची गरज आहे. दुर्दैवाने आपल्याकडे सेवापूर्व शिक्षक-शिक्षणाची प्रचंड हेळसांड झाल्याने असे शिक्षक उपलब्ध नसणे ही पण शिक्षणाच्या गुणवत्तेतील महत्त्वाची अडचण आहे. क्वेस्टतर्फे आम्ही सध्या नंदुरबार जिल्ह्यातील एका डी.एड. कॉलेजसोबत सेवापूर्व शिक्षक-शिक्षण अधिक सघन कसे करता येईल यावर काम करत आहोत. कामाच्या वेळी केलेल्या पूर्व चाचणीत छात्राध्यापकांना (डी.एड.च्या विद्यार्थ्यांना) शालेय विषयांतील अनेक घटकांत अडचणी

आहेत असे दिसून आले. आता विषयाचे ज्ञान कच्चे असताना कोणतेही शिक्षणशास्त्रविषयक प्रशिक्षण मर्यादित प्रमाणातच उपयोगी ठरेल हे उघड आहे. म्हणजे शाळेत अपूर्णांक कसे शिकवावेत यावर काम करण्याच्या जोडीला छात्राध्यापकांना अपूर्णांकातील अनेक संकल्पना शिकवाव्या लागतात. जी बाब गणिताची तीच थोड्याफार फरकाने भाषा व भूगोल या विषयांच्या बाबतही आहे. क्वेस्टने केलेल्या कामातून अजून एक बाब स्पष्ट झाली, ती म्हणजे काही मर्यादित वेळात योग्य असे मार्गदर्शन देऊन छात्राध्यापकांची शालेय विषयांची समज बऱ्यापैकी विकसित करता येते. या कामाच्या अनुभवातून प्राथमिक स्तरावरील गणित-शिक्षणाच्या संदर्भातील एक कोर्स क्वेस्टतर्फे विकसित करण्यात येत आहे. या प्रशिक्षणासाठी लागणाऱ्या वाङ्मयाचा अनुवाद करण्याचे कामही सुरू आहे. प्रशिक्षण कार्यक्रमासाठी फिल्मस् तयार केल्या आहेत.

आदिवासी मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न सोडविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न आश्रमशाळांच्या माध्यमातून होत आहेत. आदिवासी मुले औपचारिक शिक्षणाच्या प्रवाहाबाहेर फेकली जाऊ नयेत यासाठी आश्रमशाळांची मोठ्या प्रमाणावर मदत होते, यावर कुणाचेच दुमत नसावे. मात्र पुन्हा मुद्दा येतो तो गुणवत्तेचा. आश्रम शाळांतील मुलांची शालेय विषयातील संपादणूक वाढावी यासाठी क्वेस्ट नवजबाई रतन टाटा ट्रस्टच्या मदतीने नंदुरबार जिल्ह्यातील दहा आश्रमशाळांसोबत काम करत आहे. एका आश्रम शाळेत पहिली ते दहावीच्या वयाचे सुमारे चारशे विद्यार्थी निवासी असतात. आश्रम शाळांमधील प्राथमिक विभागात एकेका वर्गात (एका शिक्षकामागे) ५० ते ६० विद्यार्थी असतात. म्हणजे स्थिती शहरांतील ओसंडून वाहणाऱ्या खाजगी शाळांसारखी आहे. सुविधा मात्र शहरी शाळांच्या तुलनेत नगण्य आहेत. अनेकदा मुलांची राहण्याची जागा व वर्ग एकाच खोलीत असतो. काही शाळांमध्ये ही खोली म्हणजे अक्षरशः कच्ची झोपडी असते. इतक्या साऱ्या विद्यार्थ्यांसाठी पाण्याची व्यवस्था जवळचा ओढा अगर नदी असते. पाऊस लांबला तर जून महिन्यात सुरू होणारी शाळा जुलै-ऑगस्टपर्यंत सुरू होऊ शकत नाही. इतक्या मोठ्या प्रमाणावर मुले एकत्र राहत असतील तर त्यातून निर्माण होणारे आरोग्याचे प्रश्न हाताळण्यासाठी पुरेशी यंत्रणा नाही. काही आश्रमशाळांपर्यंत पोहोचण्यासाठी मुख्य रस्त्यापासून तीन-चार तासांची तंगडतोड करावी लागते. अशा अनेक प्रश्नांशी झुंजत ही आदिवासी मुले शिक्षण घेत आहेत.

मुलांच्या प्रश्नांची ही यादी इथेच संपत नाही, बहुतेक आदिवासी भाषा या प्रमाण मराठीपेक्षा बऱ्याच वेगळ्या आहेत. शिक्षणाचे माध्यम मराठी मात्र आसपास बोलली जाणारी भाषा वारली, भिली वा पावरी. अशा वेळी घरच्या भाषेपासून प्रमाण भाषेपर्यंत येण्याचा मुलाचा प्रवास नेमका कसा होतो, त्यात त्याला कोणत्या अडचणी येतात, त्यावर मुले कशी मात करतात याबाबत शास्त्रशुद्ध अभ्यासच झालेले नाहीत. त्यामुळे मुख्यतः या मुलांसाठीचा आरंभिक स्तरावरचा वाचन-लेखन कार्यक्रम नेमका कसा आखावा हे कळत नाही. एक निरीक्षण असे की इयत्ता चौथीत येईपर्यंत बहुतांश मुले बऱ्यापैकी मराठी समजू शकतात, पण स्वतःहून बोलण्यासाठी मराठी वापरणे त्या स्तरावरही मुलांना अवघड वाटते. मराठीबहुल इलाक्यात राहून इंग्रजी माध्यमात शिकणाऱ्या मुलांसारखी काहीशी स्थिती याही मुलांची असते. सध्या नंदुरबारमधील क्वेस्टच्या कार्यक्रमात अक्षर ओळखीसाठी पावरी व भिली शब्दांचा वापर करणे, प्रमाण मराठी व आदिवासी भाषांतील शब्द सरमिसळ करून वापरणे, स्थानिक परिसराशी संबंधित मराठी वाचन पाठ तयार करणे अशी काही तंत्रे वापरून या प्रश्नावर उपाय

**क्वेस्टच्या कामाला आता चार वर्षे पूर्ण होतील. या चार वर्षांत कामाने जी गती घेतली आहे त्याचे मुख्य श्रेय माझ्या सर्व सहकाऱ्यांना द्यावे लागेल. खरं तर त्यांचा प्रतिनिधी म्हणून मी हा पुरस्कार स्वीकारतो आहे, अशी माझी भावना आहे. त्यांच्या भक्कम पाठिंब्याशिवाय हे काम उभे राहूच शकले नसते. पहिल्या चार वर्षांतील कामातून जितके प्रश्न सुटले त्याच्या चौपट प्रश्न आकडेवारीनिशी, अधिक टोकदारपणे समोर येऊन उभे राहिले आहेत. आता या प्रश्नांना अभ्यासपूर्ण रीतीने सामोरे जाण्याचे आव्हान क्वेस्टपुढे आहे. या प्रश्नांची उत्तरे शोधताना तयार होणारी समज, ज्ञान हेच क्वेस्टसारख्या छोट्या संस्थेचे शिक्षणाच्या क्षेत्राला योगदान असू शकेल. प्रत्यक्ष कामात राहूनही संशोधनाच्या अंगाने पुढे जाण्याचा प्रयत्न आता क्वेस्टला करावा लागेल. कामात अधिकाधिक नेमकेपणा आणावा लागेल. माझ्या मते खरी चढण आता सुरू झाली आहे.**

शोधण्याचा प्रयत्न चालू आहे. याबाबत छोटी छोटी कृतिसंशोधने हाती घेण्याचा विचार चालू आहे.

इतक्या विपरीत परिस्थितीत शिक्षण घेणाऱ्या मुलांची संपादणूक अपेक्षित पातळीपेक्षा कमी असेल तर त्यात नवल नाही. आपल्यासमोर प्रश्न असा आहे की दिलेल्या परिस्थितीत आपण मुलांची संपादणूक उंचावण्याचा काही प्रयत्न करू शकतो का? क्रेस्टच्या बालभवन कार्यक्रमातून हा प्रयत्न केला जातो. या कार्यक्रमांतर्गत आदिवासी समाजातील स्थानिक युवतीस/युवकास सघन प्रशिक्षण देऊन त्याच्यामार्फत आश्रमशाळेतील इयत्ता पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते. असे काम करणाऱ्यांना बालमित्र/मैत्रीण म्हणण्यात येते. बालमित्रांना स्थानिक भाषा अवगत असल्याने ते मुलांशी सहज संवाद साधू शकतात. या प्रकल्पाचा लाभ ऑगस्ट २०१० मधील माहितीनुसार ९१० विद्यार्थी घेत आहेत. प्रकल्पाचे प्राथमिक निकाल तरी उत्साहवर्धक आहेत.

क्रेस्टच्या कामात सुरुवातीपासूनच मुख्यधारेतील मुलांच्या शिक्षणाच्या गुणवत्तेचा प्रश्न हाताळायचा प्रयत्न केला आहे. ठाणे जिल्ह्यातील वाडा तालुक्याच्या आदिवासीबहुल पूर्व भागातील १० गावांमधून इयत्ता पहिली ते चौथीच्या मुलांसाठी बालभवन कार्यक्रम चालवला जातो. शिक्षणाचे काम अंगणवाडीच्या वयातच सुरू व्हायला हवे हे लक्षात घेऊन वाडे तालुक्यातील काही अंगणवाड्यांतील बालशिक्षणाच्या सबलीकरणाचे काम हाती घेतले आहे. गावातील युवकांना प्रशिक्षण देऊन त्यांच्यामार्फत अंगणवाडीमध्ये बालशिक्षण कार्यक्रम चालवला जातो. हा कार्यक्रम महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेच्या बालविकासाभिमुख शिक्षणक्रमावर आधारित आहे. या कार्यक्रमामार्फत सहा अंगणवाड्यांतील १२० मुलांपर्यंत बालशिक्षण पोहोचत आहे.

याच भागात जिथे सरकारी शाळांतील शिक्षकांचे सहकार्य मिळेल त्या ठिकाणी त्यांच्या मार्फत व जिथे तशी अनुकूल परिस्थिती नाही तिथे गावातील सुशिक्षित युवकांना खास प्रशिक्षण देऊन शाळेला पूरक म्हणून मुलांसोबत काम केले जाते. काम सुरू करण्यापूर्वी केलेल्या सर्वेक्षणांतून एक महत्त्वाची बाब समोर आली होती. इयत्ता चौथीपर्यंतच्या मुलांची वाचन-लेखन कौशल्ये पुरेशी विकसित नाहीत यामुळे त्यांना इतर विषय शिकण्यासाठी पाठांतर किंवा अनेक वेळा 'कॉपी करणे' (न समजता उतरवून काढणे) यांसारखे मार्ग घ्यावे लागतात. इयत्ता दुसरीच्या शेवटापर्यंत मुले वाचती-लिहिती व्हावी या करता 'माझे पुस्तक' हा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. वाचन लेखनाची कौशल्ये विकसित होताना नेमक्या कोणकोणत्या घटकांचा परिणाम होत असतो याबाबतचा जवळजवळ १००० मुलांचा अभ्यास या कामातून आकाराला येत आहे. येत्या वर्षभरात प्राथमिक निष्कर्ष हाती येण्याची अपेक्षा आहे.

क्रेस्टच्या कामाला आता चार वर्षे पूर्ण होतील. या चार वर्षांत कामाने जी गती घेतली आहे त्याचे मुख्य श्रेय माझ्या सर्व सहकाऱ्यांना द्यावे लागेल. खरं तर त्यांचा प्रतिनिधी म्हणून मी हा पुरस्कार स्वीकारतो आहे, अशी माझी भावना आहे. त्यांच्या भक्कम पाठिंब्याशिवाय हे काम उभे राहूच शकले नसते. पहिल्या चार वर्षांतील कामातून जितके प्रश्न सुटले त्याच्या चौपट प्रश्न आकडेवारीनिशी, अधिक टोकदारपणे समोर येऊन उभे राहिले आहेत. आता या प्रश्नांना अभ्यासपूर्ण रीतीने सामोरे जाण्याचे आव्हान क्रेस्टपुढे आहे. या प्रश्नांची उत्तरे शोधताना तयार होणारी समज, ज्ञान हेच क्रेस्टसारख्या छोट्या संस्थेचे शिक्षणाच्या क्षेत्राला योगदान असू शकेल. प्रत्यक्ष कामात राहूनही संशोधनाच्या अंगाने पुढे जाण्याचा प्रयत्न आता क्रेस्टला करावा लागेल. कामात अधिकाधिक नेमकेपणा आणावा लागेल. माझ्या मते खरी चढण आता सुरू झाली आहे.

**– नीलेश निमकर**
२३३, वडवली रोड, मु.पो. लोणारे, ता. वाडा,
जि. ठाणे ४३१३०३.
Mob. 9822027063

ओळख । अतुल कुलकर्णी

# पॅशन, टेंपरामेंट आणि रॅशनल थिंकींग असलेला माणूस

महाराष्ट्र फाउंडेशनचा 'युवा कार्यकर्ता पुरस्कार' मिळाल्यावर नीलेशने Qest (क्वेस्ट)शी संबंधित आम्हा सर्वांना एक ई-मेल केली. त्यात त्याने म्हटले होते की हा पुरस्कार मला मिळाला असला तरी खऱ्या अर्थाने हा आपल्या 'टीम'च्या कामाचा गौरव आहे. त्यामुळे हा पुरस्कार मी तुम्हा सर्वांच्या वतीने स्वीकारणार आहे आणि ह्या पुरस्कारामुळे आपल्या सर्वांची जबाबदारी वाढलेली आहे हे आपण लक्षात ठेवायला हवे. त्याच मेलमध्ये त्याने आणखी एक कल्पना मांडली. ती म्हणजे, ह्या पुरस्काराची रक्कम आपल्या कार्यकर्त्यांमधील तीन प्रतिनिधी निवडून त्यांच्याकडे सुपूर्द करू आणि त्याचा विनियोग कसा करायचा हे ह्या तिघांनी 'क्वेस्ट'च्या इतर कार्यकर्त्यांचे मत घेऊन ठरवावे. असे करण्यामागे मला एक प्रयोग अपेक्षित आहे. पैशांशी संबंधित निर्णय विश्वस्त घेत असतात. पण ही रक्कम वैयक्तिक मिळणार असल्याने ती 'ट्रस्ट'मध्ये जमा न करता लोकशाही पद्धतीने याचा विनियोग कसा करावा हे तरुण कार्यकर्त्यांना ठरवू द्यावे.

मला वाटतं त्या मेलमधील या मुद्यांमध्ये नीलेशचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व सामावलेले आहे. त्याच्यातील शिक्षक-संशोधक व शिक्षणतज्ज्ञ सतत जागा असतो. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रयोग करून बघण्यास तो घाबरत नाही आणि शिक्षणाच्या क्षेत्रात त्याला सतत प्रयोग करून बघायचे असतात. तो असा 'लीडर' आहे ज्याला आपल्या टीमवर विश्वास टाकायला आणि जबाबदाऱ्या द्यायला आवडतात. तो असा 'व्हिजनरी' आहे, ज्याला त्याच्याबरोबर काम करणाऱ्या सर्वांचं महत्त्व माहीत असतं आणि तो ते जाहीरपणे सांगायलाही मागे-पुढे पाहात नाही. उदाहरणार्थ, तो स्वतःकडे क्रेडिट घेत नाही. जे काम झालं आहे किंवा हाती घेतलं आहे त्यावर समाधानी न राहता याच्याही पुढे आपण कसे जाऊ शकतो याचा शोध तो सतत घेत असतो.

माझी आणि नीलेशची ओळख गेल्या सहा वर्षांपासून आहे. ह्या सहा वर्षांत त्याच्यामध्ये जे मुख्य गुण मला दिसले त्यांतला सर्वांत महत्त्वाचा गुण म्हणजे त्याची 'पॅशन', आणि दुसरा महत्त्वाचा गुण म्हणजे त्यांचं 'टेंपरामेंट'. मला नेहमी असं वाटत आलं आहे की, बुद्धिमत्ता खूप लोकांकडे असते, पण बुद्धिमत्तेच्या जोडीने पॅशन, टेंपरामेंट आणि रॅशनल थिंकिंग असलेली माणसं फार कमी असतात. आणि एखादं कार्य मोठं करायचं असेल तर फक्त बुद्धिमत्ता असून चालत नाही, इतर दोन गोष्टी असाव्या लागतात, ज्या नीलेशकडे आहेत.

१ जानेवारी २००७ रोजी आम्ही (Quality Education Support Trust) 'क्वेस्ट'ची स्थापना केली. या संस्थेचे जे संस्थापक-विश्वस्त आहेत त्यांत मी सुरुवातीपासून आहे. अगदी 'क्वेस्ट'च्या संकल्पनेपासून. माझी यामागची भूमिका अशी आहे की, नीलेशसारखा माणूस अत्यंत दुर्मिळ आहे आणि आजच्या आपल्या समाजाला त्याच्यासारख्या माणसांची फार आवश्यकता आहे. कारण माझं असं ठाम मत आहे की, आपल्या देशातल्या बहुतेक सर्व समस्यांचं मूळ आपल्या चुकीच्या शिक्षणपद्धतीत आहे. स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षण आणि तेही प्राथमिक व पूर्वप्राथमिक शिक्षण जास्त महत्त्वाचं असायला पाहिजे होतं. त्याच्याकडे खूपच दुर्लक्ष झालेलं असल्यामुळे आता आपलं मुख्य लक्ष ह्या क्षेत्राकडे वळवलं पाहिजे. त्यासाठी नीलेशसारख्या माणसांची आवश्यकता आहे.

'क्वेस्ट'ची स्थापना करताना माझ्या मनात हे पक्कं होतं की, नीलेशसारख्या माणसाच्या भोवती एक 'इन्फ्रास्ट्रक्चर' उभं करण्यासाठी मदत करायची. त्यामुळे माझा 'क्वेस्ट'च्या बाबतीतला सहभाग त्या दिशेने वळवलेला असतो. त्याच्या नेतृत्वाखाली एक संपूर्ण टीम आणि त्या सर्वांना लागणारं 'इन्फ्रास्ट्रक्चर' उभं राहावं असा प्रयत्न आम्ही सर्व विश्वस्त करतो. गेल्या तीन वर्षांत जवळपास तीस कार्यकर्त्यांची फौज

आणि पंधरा ते वीस छोट्या गावांमधील एक हजारापेक्षा जास्त मुले, अनेक शिक्षक आणि अनेक प्रकल्प 'क्वेस्ट'शी जोडले गेले आहेत. हे इतकं मोठं काम गेल्या फक्त तीन वर्षांत उभं राहिलं. याचं श्रेय नीलेशच्या व्हिजनला आणि त्याच्या व्यवस्थापकीय कौशल्याला जातं.

मला असं वाटतं की, हे काम देशाच्या जडणघडणीत खूप छोटं असलं तरी अत्यंत मूलभूत आणि महत्त्वाचं आहे. ह्यापुढच्या काळात 'क्वेस्ट'ची आणि नीलेशची मुख्य जबाबदारी आणखी अनेक 'नीलेश निमकर' घडवणं ही आहे. महाराष्ट्र फाउंडेशनच्या या पुरस्काराने (जो महाराष्ट्राचा मॅगेसेसे म्हणून ओळखला जातो) 'क्वेस्ट'च्या कार्यकर्त्यांना खूप हुरूप आला आहे.

'क्वेस्ट'चं मुख्य केंद्र 'ठाणे' जिल्ह्यातील 'वाडा' तालुक्यातील 'सोनाळे' या गावात आहे. तो सर्व आदिवासीबहुल भाग आहे. 'क्वेस्ट' सुरू करण्यापूर्वी आम्ही महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागांत हिंडलो होतो आणि एका व्यावसायिक सर्व्हे एजन्सीकडून (आम्ही जिथे काम करण्याची आवश्यकता आहे त्या भागांचा) सर्व्हे केला होता. त्या सर्व्हेनुसार वेगवेगळ्या घटकांचा विचार करून 'सोनाळे' हे गाव आम्ही निवडलं. ते गाव निवडण्यामागे एक शास्त्रशुद्ध विचार होता. आमची व्हिजन 'Education for all Individuals' अशी आहे. आणि ब्रीदवाक्य Freedom and Rationality हे आहे. आम्ही आमच्या कामाचं स्वरूप काय असावं याचा संपूर्ण विचार केला होता. संस्थेचं नावही विचारपूर्वक ठरवलं होतं.

आम्ही असं ठरवलं होतं की, आपल्याला फक्त आधुनिक किंवा वेगळ्या पद्धतीने शिक्षण देणारी शाळा काढायची नाहीये. सध्या अस्तित्वात असलेल्या सरकारी शाळांची जी यंत्रणा आहे ती किंवा इतर शाळांच्या यंत्रणेत जे धोके आहेत ते टाळून वेगवेगळ्या संकल्पनांवर प्रयोग करून अशी काही मॉडेल्स तयार करायची जी अन्यत्र वापरता येतील. वेगवेगळ्या ठिकाणी वापरता येऊ शकतील अशी आणि ज्यामुळे शिक्षणाचा दर्जा सुधारेल अशी मॉडेल्स निर्माण करणं हा आमच्या कामाचा मुख्य उद्देश आहे. त्यामुळे प्रचलित शिक्षणपद्धतीच्या विरोधात न जाता, या व्यवस्थेच्या बरोबर राहून जास्तीत जास्त लोकांचा अधिकाधिक गुणात्मक विकास करायचा; या विचारावर 'क्वेस्ट' उभी आहे आणि त्याप्रमाणेच काम चालू आहे. 'क्वेस्ट'ची स्थापना केल्यानंतर सर्वप्रथम आम्ही 'बालभवन' नावाचे मॉडेल तयार केले. याच्यात शाळेच्या वेळेआधी आणि शाळेच्या वेळेनंतर असं पहिली-दुसरी आणि तिसरी-चौथी या इयत्तांतल्या मुलांसाठी काम चालतं. तिथे बालमित्र काम करतात, जे मुलांमध्ये दर्जात्मक सुधारणा करण्यासाठी वेगवेगळ्या योजना राबवतात. त्या योजना राबवण्यासाठी त्या त्या गावातल्या होतकरू तरुण-तरुणी निवडून त्यांना उत्तम प्रकारचं प्रशिक्षण देऊन तयार केलं जातं. हे स्थानिक बालमित्रच 'बालभवन' चालवतात. या प्रयोगाला चांगला प्रतिसाद मिळाला आहे आणि त्याचा चांगला परिणाम पाहून 'टाटा ट्रस्ट'ने नंदुरबार आणि धडगाव या अत्यंत मागासलेल्या भागांत अशी बालभवनं सुरू करण्यासाठी 'क्वेस्ट'ला बोलावून घेतलं आहे.

आम्ही 'रिसोर्स सेंटर' (साधन केंद्र) हे एक मॉडेल तयार करीत आहोत. या साधन केंद्रात शाळेतील मुले, गावातला तरुण वर्ग आणि इतर नागरिक या सर्वांच्या वैयक्तिक विकासासाठीचे उपक्रम राबवले जातात. या केंद्राच्या ठिकाणी शैक्षणिक साधनं असतात, मुलांसाठी वैज्ञानिक खेळणी असतात, वाचनालय, प्रयोगशाळा, फिल्म क्लब असतात. तेथे प्रशिक्षण-कार्यशाळा होतात. शिक्षकांसाठी अभ्यासवर्ग चालवले जातात, संगणकाचे प्रशिक्षण दिले जाते. समाजाच्या सर्व वयाच्या व सर्व

**'क्वेस्ट'ची स्थापना करताना माझ्या मनात हे पक्कं होतं की, नीलेशसारख्या माणसाच्या भोवती एक 'इन्फ्रास्ट्रक्चर' उभं करण्यासाठी मदत करायची. त्यामुळे माझा 'क्वेस्ट'च्या बाबतीतला सहभाग त्या दिशेने वळवलेला असतो. त्याच्या नेतृत्वाखाली एक संपूर्ण टीम आणि त्या सर्वांना लागणारं 'इन्फ्रास्ट्रक्चर' उभं राहावं असा प्रयत्न आम्ही सर्व विश्वस्त करतो. गेल्या तीन वर्षांत जवळपास तीस कार्यकर्त्यांची फौज आणि पंधरा ते वीस छोट्या गावांमधील एक हजारापेक्षा जास्त मुले, अनेक शिक्षक आणि अनेक प्रकल्प 'क्वेस्ट'शी जोडले गेले आहेत. हे इतकं मोठं काम गेल्या फक्त तीन वर्षांत उभं राहिलं. याचं श्रेय नीलेशच्या व्हिजनला आणि त्याच्या व्यवस्थापकीय कौशल्याला जातं.**

स्तरातील स्त्री-पुरुषांना उपयोगी पडतील असे उपक्रम आणि उपकरणे तिथे उपलब्ध असतात. शहरी व ग्रामीण अशा दोन्ही प्रकारच्या विद्यार्थ्यांना उपयोग होऊ शकेल अशा पद्धतीचे 'शैक्षणिक साधन केंद्र' निर्माण करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

अंगणवाड्यांबरोबरही 'बालभवन'सारखं काम चालू आहे. गुणात्मक विकासाच्या दृष्टीने तिथे काम केलं जातं. मराठी लिहिता-वाचता येण्यासाठीची जी आधुनिक तंत्रं आहेत त्यांचा अभ्यास करून आठ पुस्तकांचा एक संच 'क्वेस्ट'ने तयार केला आहे. गणिताच्या मूलभूत संकल्पना समजण्यासाठी पुस्तकं व काही साधनं तयार केली आहेत. अर्थातच कविता आणि गोष्टी यांबाबतही काही साधनं तयार केलेली आहेत. ही सर्व साधनं 'बालभवन'मध्ये आणि अंगणवाडीत वापरली जातात आणि मुख्य म्हणजे फक्त 'क्वेस्ट'चं काम चालू आहे तिथेच नव्हे तर शहरी आणि ग्रामीण भागांतल्या अनेक शाळा या साधनांचा उपयोग करीत आहेत. ही साधनं तयार करून त्यांचा परिणाम तपासून बघणारा 'डेटा' सुरुवातीपासूनच गोळा केला जात आहे. त्याची वेळोवेळी तपासणी होत असते आणि त्यातून निघालेल्या निष्कर्षांचे एका त्रयस्थ एजन्सीकडून परीक्षण वेळोवेळी करून घेतले जाते. जास्तीत जास्त लोकांना उपयोग होईल असं काम करण्याची ही पूर्वतयारी आहे.

ग्रामीण भागातल्या मुलांना इंग्रजी भाषेची बरीच धास्ती वाटते म्हणून त्यांना साध्या, सोप्या व सुलभ पद्धतीने इंग्रजी शिकवण्यासाठी काय करता येईल, त्यासाठी कोणता अभ्यासक्रम असू शकेल, यावर संशोधन चालू आहे. येत्या काही महिन्यांत असा कार्यक्रम प्रायोगिक तत्त्वावर राबवण्यासाठी आवश्यक तयारी जवळपास झाली आहे.

'मोबाईल लायब्ररीज्' आणि 'मोबाईल लॅबोरेटरीज्' तयार करण्यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत. आठवी ते दहावीच्या मुला-मुलींना वाचनाची सवय लावण्यासाठी आणि वैज्ञानिक प्रयोग करून पाहण्यासाठी त्यांचा उपयोग होईल.

ग्रामीण व शहरी भागांमध्ये या उपक्रमांचे लाभार्थी आहेत. टाटा ट्रस्ट व इतर काही संस्थांनीही 'क्वेस्ट'ला चांगले पाठबळ दिले आहे. इतर शिक्षणसंस्थांचा विश्वासही 'क्वेस्ट'ने मिळवला आहे आणि ही सर्वांत महत्त्वाची पावती आहे. शेकडो लोक दत्तक-पालक योजनेच्या माध्यमातून 'क्वेस्ट' मागे उभे आहेत. प्रत्येक मुलामागे येणारा एक वर्षाचा किंवा त्याच्या संपूर्ण शिक्षणाचा खर्च देऊ इच्छिणाऱ्यांसाठी 'दत्तक पालक योजना' आहे. या योजनेद्वारे देशातील व परदेशातील लोक जोडले गेले आहेत. शिक्षणक्षेत्रातील तज्ज्ञ मंडळीसुद्धा 'क्वेस्ट'च्या संपर्कात येत आहेत. सरकारी पातळीवर जिल्हा परिषद शाळांतील शिक्षक व अधिकारी यांचं सहकार्य मिळत आहे. सलग दोन वर्षे 'नॅशनल सायन्स काँग्रेस'मध्ये सहभागासाठी 'क्वेस्ट'ची निवड झाली आहे. राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांनीही 'क्वेस्ट'ला भेट दिली आहे.

(शब्दांकन : विनोद शिरसाठ)

**अतुल कुलकर्णी**
**ak@atulkulkarni.com**